क्रमांक:पोअवा/आस्था/बदल्या/पो.कर्म./6126/२०१७,
पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
वाशिम. दिनांक :- 1 1 AUG 2017

विषय :- बदल्याबाबत...

-oooo-

**परिपत्रक :-**

आमच्या असे निर्देशनास आले आहे की, आम्ही पोलीस कर्मचारी यांची प्रशासकीय कारणास्तव व विनंतीवरुन बदल्या करण्याकरीता त्यांना जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांचे समक्ष बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून त्यांची जास्तीत जास्त प्रमाणात त्यांचे सोयीनुसार प्रशासकीय कारणास्तव व विनंतीनुसार पोलीस स्टेशन व शाखेची स्थिती पाहून बदल्या करण्यात आलेल्या आहेत. सदर बदल्या निस्:पक्ष प्रमाणे आस्थापना मंडळ यांचे समक्ष बोलवून करण्यात आली आहे. तरी काही पोलीस कर्मचारी हे पुन्हा बदल्याकरीता आज्ञांकित कक्ष मिळणेबाबत विनंती अर्ज या कार्यालयास सादर करीत आहे. बदल्या करीता वारंवार विनंती अर्ज / आज्ञाकिंत कक्षात येवून हि बाब पोलीस खात्यात न शोभणारी असुन पोलीस शिस्तीला धरुन नाही. पोलीस कर्मचारी यांची विनंती नुसार बदली मिळणे हा त्यांचा हक्क नाही पोलीस स्टेशन / शाखेचा रिक्त पदाचा आढावा घेवून सदरची बदली करण्यात आलेली आहे. त्यामध्ये कोणत्याही पोलीस कर्मचारी यांची त्यांचे मनाप्रमाणे सदरची बदली झाली नसल्यास तरी सदर पोलीस कर्मचारी ज्यांची ज्या ठिकाणी बदली करण्यात आलेली आहे. त्यांनी त्यांचे बदलीचे ठिकाणी त्वरीत हजर होवून आपले कर्तव्य पारपाडतील तसेच विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा त्यांचा अधिकार नसुन प्रशासकीय सोईनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवुन बदलीचा विचार करण्यात आलेला आहे.

यापुढे सर्व पोलीस कर्मचारी यांना कळविण्यात येते की, जेव्हा बदली करीता विनंती अर्ज या कार्यालयाकडून मागविण्यात येतील तेव्हा सदर पोलीस कर्मचारी यांनी बदली करीता विनंती अर्ज या कार्यालयास सादर करावा. तसेच या कार्यालयास प्राप्त झालेल्या विनंती अर्ज ज्यांचा विचार करण्यात आलेला नाही. अशा सर्व प्रकारचे अर्ज दप्तरी दाखल करण्यात येत आहे. तसेच या पुढे बदली संदर्भात प्राप्त झालेल्या अर्ज दप्तरी करण्यात येणार आहे. अशी सर्व कर्मचारी यांना सकाळ / संध्याकाळचे गणनेचे वेळेत नमुद परिपत्रकानुसार सुचना देवून सदरचे परिपत्रक पोलीस स्टेशन व शाखेचा नोटीस बोर्डवर सर्वाकरीता लावण्यात यावे.

तसेच आमच्या निर्देशनास आले आहे की, काही पोलीस कर्मचारी यांची नेमणुक दुसऱ्या पोलीस स्टेशन तसेच ते दुस-या पोलीस स्टेशन व शाखेला डयुटीपासवर काम करीत आहे. या परिपत्रकाद्वारे पोलीस मुख्याल, वाशिम येथील कर्मचारी यांना सोडून सर्व पोलीस स्टेशन व शाखेतील डयुटीपासवर देण्यात आलेल्या कर्मचारी यांचे डयुटीपासचे आदेश या परिपत्रकाद्वारे रद्द करण्यात येत आहे. यापुढे ज्या कर्मचाऱ्यांची जिथे नेमणुक आहे. सदरचे कर्मचारी जिथेच डयुटी करतील. कोणत्याही पोलीस कर्मचारी यांना डयुटीपास व डयुटीकरीता देण्यात येणार नाही. तसेच ज्या पोलीस पोलीस कर्मचाऱ्यांना कसुरीचे अनुषंगाने पोलीस मुख्यालय, वाशिम येथे ॲटच करण्यात आले आहे व ज्या पोलीस स्टेशन ला बंदोबस्तकरीता कर्मचारी पुरविण्यात आलेले आहे. अशा कर्मचारी यांना सोडून सर्व पोलीस कर्मचारी ज्यांना डयुटीकरीता व डयुटीपासवर देण्यात आले आहे. त्यांना सदरचे परिपत्रक ई-मेल व व्हाटस अपवर प्राप्त होताच त्यांना त्यांचे मुळ नेमणुकीचा ठिकाणी कार्यमुक्त करुन तसा पुर्तता अहवाल विनाविलंब उपविभागीय पोलीस अधीकारी व पोलीस उपअधिक्षक(मुख्या.), वाशिम यांचे मार्फत न चुकता सादर करावा.

३/- पोलीस स्टेशन / शाखा येथे ज्या कर्मचारी यांची बदली व नेमणुक जिथे आहे. सदर कर्मचारी हे तिथेच काम करतील. ठाणेदार व शाखा प्रभारी यांनी कोणत्याही कर्मचारी यांना तोंडी आदेशान्वये सोडू नये असे असल्यास तसा अहवाल आमच्या कार्यालयास पुढील कार्यवाही करीता पाठविण्यात यावा याची नोंद घ्यावी. सदरचे परिपत्रक प्राप्त होताच संबंधीत ठाणेदार यांनी त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती या कार्यालयास दोन दिवसात खास दुतासोबत न चुकता सादर करावी.

**(मोक्षदा पाटील)**
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

सर्व ठाणेदार / सर्व शाखा प्रभारी, वाशिम जिल्हा / रापोनि.,पोलीस मुख्यालय, वाशिम.



Transfer-2017 GT-shukla

२/- सर्व ठाणेदार व शाखा प्रभारी यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पोलीस कर्मचारी यांचे निर्देशनास सदर परिपत्रक आणून दयावे. तसेच या अगोदर बदली झालेल्या कर्मचारी यांना सोडण्याबबात वेळोवेळी बिनतारी संदेशाद्वारे कळविण्यात आले असता अद्याप ही काही प्रभारी अधिकारी यांनी बदली झालेल्या कर्मचारी यांना अद्याप पर्यंत त्यांचे बदलीचे ठिकाणी सोडलेले नाही. या परिपत्रकाद्वारे पुन्हा आपणास कळविण्यात येते की, ज्या पोलीस कर्मचारी यांची बदली झाली आहे. त्यांना अद्याप पर्यंत त्यांचे बदलीचे ठिकाणी सोडण्यात आलेले नाही. तसेच ज्या कर्मचारी यांना डयुटीपास व डयुटीकरीता देण्यात आले आहे. अशा पोलीस कर्मचारी यांना सदरचे परिपत्रक प्राप्त होताच त्यांना त्यांचे बदलीचे ठिकाणी व मुळ नेमणुकीचा ठिकाणी कार्यमुक्त करुन तशा पुर्तता अहवाल उपविभागीय पोलीस अधीकारी व पोलीस उपअधीक्षक(मुख्या.), यांचे मार्फत या कार्यालयास न चुकता सादर करावा.

३/- ठाणेदार व शाखा प्रभारी यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेले ज्या कर्मचा-यांची नेमणुक आपले पोलीस स्टेशन व शाखेत आहे. त्यांना या परिपत्रक निर्गमित झाल्याचे तिन दिवसात बदली व डयुटीपासवर देण्यात आलेले कर्मचारी आपले पोलीस स्टेशन व शाखेत हजर झालेले नाहीत. अशा कर्मचारी यांचे सद्याचे नेमणुकीचा ठिकाण कर्मचाऱ्यांचे नांवासह अहवाल तिन दिवसानंतर या कार्यालयास न चुकता सादर करावा. तसेच नमुद कर्मचारी यांचे माहे-ऑगस्ट चे वेतन त्यांचे बदली झाल्याचे ठिकाणी पासुन काढण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

प्रत माहितीस :-

उपविभागीय पोलीस अधीकारी, वाशिम / मंगरुळपीर/कारंजा/ पोलीस उपअधिक्षक(मुख्या.), वाशिम.

२/- आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेले सर्व पोलीस स्टेशन व शाखेतील पोलीस कर्मचारी यांना ठाणेदार व शाखा प्रभारी यांनी सदर कर्मचारी यांना कार्यमुक्त करुन तशा अहवाल विनाविलंब या कार्यालयास न चुकता सादर करावा. तसेच पोलीस स्टेशन व शाखेत ज्या कर्मचारी यांची बदली झाली आहे. अशा कोणत्याही पोलीस कर्मचारी हे सद्याचे नेमणुकीचे ठिकाणी राहणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना :-

कार्यालय अधीक्षक/प्रमुख लिपीक लेखाशाखा/ वेतन लिपीक/डिपीजी लिपीक/संगणक कक्ष पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.

२/- प्रमुख लिपीक लेखाशाखा व वेतन लिपीक यांना कळविण्यात येते की, ज्या कर्मचारी यांची बदली झाली आहे अशा कर्मचा-यांचे माहे-ऑगस्ट चे वेतन त्यांचे बदली झाल्याचे ठिकाणी काढण्यात यावे.

३/- संगणक कक्ष यांनी सदरचे परिपत्रक पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संकेतस्थळावर सर्वाकरीता प्रसिध्द करुन तसचे पोलीस स्टेशन व शाखा प्रभारी यांचे ई-मेल आयडी व अधीकारी, व्हॉटस ॲप वर पाठविण्यात यावे.